IIP: WJHSS | IIP World Journal of Humanities and Social Sciences

**An Online Peer-Reviewed / Refereed Journal**
Vol: 01 No. Issue IV, (October-December) (2025)
Impact Factor: IIFS: 5.75
ISSN: 3107-6661 (Online)

# सावित्रीबाई फुले: समानतेची ज्योती

**प्राजक्ता राजेंद्र चव्हाण**
असिस्टंट प्रोफेसर
श्री. एम. डी. शहा महिला महाविद्यालय, मालाड (पश्चिम) मुंबई

**Article Info**

***Article History:***
Received: 15th Dec 2025
Accepted: 18th Dec 2025
Published: 20th Dec 2025

***Keywords:***
*सावित्रीबाईंचे जीवन, समानतेची ज्योती*

**ABSTRACT**

भारतीय इतिहासाच्या पानांवर अनेक युगांतरणी व्यक्तींच्या अमर कथा कोरलेल्या आहेत, ज्यांनी सामाजिक बंधनांना आव्हान देऊन समानतेच्या उजेडाने समाजाला आलोकित केले. १९व्या शतकातील ब्रिटिश राजवटीत, जेव्हा स्त्रिया आणि दलित समाजाच्या वंचित घटकांना शिक्षणाच्या द्वारापासूनही वंचित ठेवले जात होते, तेव्हा लिंगभेद आणि जातीभेदाच्या जंजाळातून मुक्तीचा ध्यास घेतलेल्या एका दाम्पत्याने क्रांतीचा बिगुल फुंकला. ते म्हणजे महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले – एक अशी जोडी, जी केवळ वैवाहिक नात्यात नव्हे, तर सामाजिक न्यायाच्या लढ्यातही एकमेकांची सावली आणि आधारभूता ठरली. सावित्रीबाई फुले, ज्या केवळ एका स्त्री शिक्षिकेपलीकडे जाऊन समाजसुधारक, नेत्या आणि मायेच्या प्रतिमेचे प्रतीक ठरल्या, त्या आजही महिलांच्या सक्षमीकरणाच्या चळवळीला प्रेरणास्थान आहेत.

***Plagiarism Check Report:***
Date of Report: Dec 17, 2025
Similarity Index: 2%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2025 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite:** Chavan, P. R. (2025). सावित्रीबाई फुले: समानतेची ज्योती. *IIP: World Journal of Humanities and Social Sciences (IIPWJHSS)*, 1(VI), 2037–2042.

**प्रस्तावना:**

सावित्रीबाईंचे जीवन हे संघर्ष आणि समर्पणाची अनघट कथा आहे. दहाव्या वर्षी विवाहबद्ध झालेल्या एका ग्रामीण मुलीपासून ते भारतातील पहिल्या व्यावसायिक प्रशिक्षित महिला शिक्षिका आणि मुख्याध्यापिका होईपर्यंतचा प्रवास, हा केवळ वैयक्तिक उन्नतीचा नव्हे, तर संपूर्ण समाजाच्या उत्थानाचा दस्तावेज आहे. त्यांनी भिडे वाड्यात सुरू केलेली पहिली मुलींची शाळा ही केवळ इमारत नव्हती, तर अंधश्रद्धा आणि अस्पृश्यतेच्या भिंती भेदणारा एक क्रांतिकारी पाया होता. दगडफेक, शिवीगाळ आणि सामाजिक बहिष्काराला तोंड देतही त्यांनी ज्ञानदानाचे कार्य अविरत चालवले. केशवपन प्रथा, बालहत्या प्रतिबंधक गृह, विधवा पुनर्विवाह आणि अस्पृश्यांसाठीचे कार्य – या प्रत्येक पायरीवर सावित्रीबाईंच्या पावलांचा ठसा आहे. सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून त्यांनी केवळ समाजसुधारणा नव्हे, तर एक नवा विचारसरणीचा जन्म दिला, जो आजही समानतेच्या लढ्यात मार्गदर्शक ठरतो.

१८४८ मध्ये एका ब्राह्मण मित्राच्या लग्नात वरातीत चालत असताना ज्योतिबांना जातीभेदावरून अपमान सहन करावा लागला आणि हीच घटना त्यांच्या आयुष्याला कलाटणी देणारी ठरली. समाजाच्या उन्नतीसाठी एक प्रमुख साधन म्हणून शिक्षणाचे महत्त्व ज्योतिबांनी ओळखले आणि समाजाला ही सांगितले. आणि त्यांच्या या कार्यात त्यांना खंबीरपणे साथ दिली ते म्हणजे त्यांच्या धर्मपत्नी सावित्रीबाई ज्योतिबा फुले यांनी. ज्योतिबांनी स्त्री आणि वंचित घटक यांच्या शिक्षणासाठी आणि इतर अधिकारांसाठी कार्य केले परंतु या कार्याची सुरुवात करताना शिक्षण हे अग्रस्थानी ठेवले समाजात कोणताही बदल घडवायचा असेल तर त्याची सुरुवात स्वतःपासून करावी असे म्हणतात अशीच स्त्री शिक्षणाची सुरुवात त्यांनी आपल्या पत्नीपासून केली सावित्रीबाई फुले यांना शिक्षणाचे धडे दिले आणि स्त्रियांच्या शाळेच्या त्या पहिल्या शिक्षिका ठरल्या.

शिक्षणा सोबतच सावित्रीबाईंनी वंचित समाजासाठी ही कार्य केल. संपूर्ण आयुष्य त्यांनी समाजसेवेसाठी खर्ची केले. सावित्रीबाईंच्या या कार्यावर प्रकाश टाकण्याचा एक छोटा प्रयत्न या शोध निबंधात करण्यात आलेला आहे. या शोधनिबंधाचा उद्देश सावित्रीबाई फुले यांच्या वैयक्तिक आयुष्यावर प्रकाश टाकणे, त्यांच्या शिक्षणविषयक कार्याचा अभ्यास करणे, सत्यशोधक समाजातील त्यांच्या नेतृत्वाचे परीक्षण करणे आणि स्त्री-वंचितांसाठी केलेल्या सामाजिक कार्याचा आढावा घेणे हा आहे. या निबंधातून सावित्रीबाईंच्या कार्याचे वैशिष्ट्यपूर्ण पैलू उलगडून, आजच्या काळातही त्यांच्या विचारांचे महत्त्व अधोरेखित करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. सावित्रीबाईंच्या शब्दांतच, "शिक्षण हे स्त्रियांचे अस्त्र आहे, ज्याने समाजाच्या अंधारावर विजय मिळवता येईल." हा निबंध त्या विजयाची एक छोटीशी जाणीव करून देणारा आहे

**सावित्रीबाईंचे पूर्वायुष्य आणि ज्योतिबांसोबत विवाह:-**

पुरातन कर्मठ विचार असलेल्या समाजात ३जानेवारी १८३१ रोजी सावित्रीबाईंचा जन्म सातारा जिल्ह्यातील खंडाळा तालुक्यात नायगाव या गावी झाला. सावित्रीबाईंच्या घरी पणजोबा, आजोबा, आई, वडील आणि त्यांची तीन भावंड असा परिवार होता. सावित्रीबाई या खंडोजी नेवसे पाटील लक्ष्मीबाई यांच्या ज्येष्ठ कन्या. सावित्रीबाई खेरीज सिदूजी, सखाराम आणि श्रीपती अशी भावंडांची नावे होती. बालपणी सावित्रीबाई आई-वडिलांना शेतात मदत करत. त्यांचे बालपण सर्वसामान्य ग्रामीण मुलीसारखे गेले. वडिलांकडे पाटीलकी व इनामदारकी असल्याने गोरी गरिबांच्या प्रश्नांची जाण,वडिलांची निरपेक्ष व्यवहारवृत्ती, समतादृष्टी, कष्टाळूनिती, प्रामाणिकपणा व सत्यनिष्ठा आणि आईकडून सोशिकपणा, सेवावृत्ती, अन्नदान करणे हे गुण सावित्रीबाई मध्ये अवतरले होते. त्यांच्यात निरीक्षण शक्ती व सामाजिक समाज लहानपणापासूनच घरातून मिळाली होती. या अंगभूत गुणांचा सावित्रीबाईंना भावी आयुष्यात फार मोठा लाभ झाला.

फाल्गुन वद्य ५ शके १७६८ ( इ. स. १८४०) साली वयाच्या दहाव्या वर्षी सावित्रीबाईंचा विवाह ज्योतिबा फुले यांच्याशी झाला ११ एप्रिल १८२७ रोजी पुण्यात जन्मलेले ज्योतिबा त्यावेळी तेरा वर्षांचे होते .सावित्रीबाई व ज्योतिबा यांच्या वैवाहिक जीवनाचा प्रवाह पन्नास वर्षांचा आहे. १८४० पासून शेवटच्या क्षणापर्यंत सतत ज्योतिबांना सावलीप्रमाणे साथ देणारी दिनांची

माऊली सावित्रीबाई आदर्श वैवाहिक जीवनाचे श्रेष्ठतम प्रतीक होय.[1]

**सावित्रीबाई फुले यांच्या शिक्षणाची सुरुवात:-** लग्नानंतर लगेच (१८४० च्या शेवटी किंवा १८४१ च्या सुरुवातीला) ज्योतिबा फुले यांनी सावित्रीबाईंना घरीच शिकवायला सुरुवात केली. ते शेतात काम करताना दुपारी बोलत बोलत वाचन-लेखन शिकवत असत. ज्योतिबांनी स्वतः अभ्यास करून त्यांना मराठी, इंग्रजी आणि इतर मूलभूत विषय शिकवले.

यात त्यांच्या मावशी सगुणाबाई (सगुणाऊ) यांचीही मदत झाली. ही सुरुवातीची प्राथमिक शिक्षणाची पायाभरणी होती, जी मुख्यतः घरीच झाली. सावित्रीबाईंच्या उत्साहाने प्रभावित होऊन ज्योतिबांनी त्यांना शिकवण्यावर भर दिला. प्राथमिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर, सावित्रीबाईंनी त्यांच्या मित्र सखाराम येश्वंत परांजपे आणि केशव शिवराम भवलकर यांच्या मार्गदर्शनाखाली अभ्यास केला. हे अभ्यासक राम होते आणि त्यांनी सावित्रीबाईंना अधिक प्रगत विषय शिकवले. याच काळात त्यांनी इंग्रजी शाळेत तिसरे आणि चौथे वर्षाचे अभ्यासक्रम पूर्ण केले. हा काळ त्यांच्या शिक्षणाचा मुख्य भाग होता, ज्यात वाचन, लेखन, गणित आणि सामान्य ज्ञान यांचा समावेश होता.

**१८४६-४७ मध्ये सावित्रीबाईंनी दोन शिक्षिका प्रशिक्षण कार्यक्रम पूर्ण केले:**

पहिला: अहमदनगरमधील अमेरिकन मिशनरी सिंथिया फरार (Cynthia Farrar) यांच्या संस्थेत. येथे त्यांना आधुनिक शिक्षण पद्धती आणि वर्गव्यवस्था शिकवली गेली.

दुसरा: पुण्यातील नॉर्मल स्कूल (शिक्षक प्रशिक्षण शाळा) मध्ये. येथे त्यांनी तिसरा आणि चौथा वर्षाचा अभ्यासक्रम उत्तीर्ण केला.

या प्रशिक्षणानंतर १८४७ मध्ये त्या भारतातील पहिल्या व्यावसायिक प्रशिक्षित महिला शिक्षिका आणि मुख्याध्यापिका बनल्या. हा त्यांच्या शिक्षणाचा पूर्णत्वाचा टप्पा होता.

**स्त्री शिक्षणाचे कार्य:-**

तात्कालीन समाजामध्ये स्त्रियांविषयी अत्यंत प्रतिकूल विचार होते. स्त्री शिकली म्हणजे धर्म संकट चढावले शिक्षणाने स्त्रिया विधवा होतात पुत्रप्राप्ती होत नाही देवाचा खूप होतो अक्षराच्या आळया बनवून पतीच्या ताटात जातात अशा अनेक अंधश्रद्धा स्त्रियांच्या मनावर खोलवर रुजल्या होत्या अशा परिस्थितीतून बाहेर काढून स्त्रियांना मान सन्मानाचे जीवन जगण्याचा मार्ग केवळ शिक्षणामुळे मिळू शकतो हे ज्योतिबांनी ओळखले व स्त्री शिक्षणात सुरुवात केली या सर्वात सावित्रीबाईंचा मोलाचा वाटा आहे इसवी सन १८४८ मध्ये पुण्याच्या भिडे वाड्यात मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली आणि या शाळेत मुलींना शिकवण्याचे काम केले ते म्हणजे सावित्रीबाई फुले सावित्रीबाई फुले भारताच्या पहिल्या महिला शिक्षिका ठरल्या. समाजातील कर्मठ लोकांचा विरोध, टिंगलटवाळी, शिवीगाळ इतकेच नव्हे तर दगड धोंड्यांचा,शेणा मातीचा मारा सहन करत त्यांनी ज्ञानदानाचे आपले कार्य अविरत सुरू ठेवले. पतीसह राहते घर सोडणे सावित्रीबाईंनी पसंत केले मात्र स्त्री शिक्षणाच्या कार्यापासून त्या मागे हटल्या नाहीत. त्या काळात एवढे मोठे सामाजिक काम हाती घेणे सोपे नव्हते. स्त्रियांकरिता शाळा विचारच लोकांना सहन होणार नव्हता.शिक्षण म्हणजे अधार्मिक, अनर्थ कार्य असे लोकांना वाटत असे.त्यामुळे समाज बिथरला. खूप लोकांना ही गोष्ट आवडली नाही. प्रथम मुलींच्या शाळेला शिक्षकच मिळत नव्हते तेव्हा सावित्रीबाईंनी शिक्षकाची धुरा स्वतः सांभाळली. त्या रोज शाळेत जाऊ लागल्या, मुलींना शिकवू लागल्या, स्वच्छतेचे महत्त्व पटवून देऊ लागल्या. मुलींना शाळेत कंटाळा येऊ नये म्हणून त्यांना गोष्टी सांगत, खेळ शिकवत अशा प्रकारे मुलींच्या शिक्षणासाठी सावित्रीबाई रोज कष्ट करत. अनेक वेळा अशी ही परिस्थिती येईल की सावित्रीबाई शाळेत जात असताना त्यावर चिखल शेण उडवले जात,यावर उपाय म्हणून सावित्रीबाई आपल्या पिशवीत एक साडी ठेवत व शाळेत आल्यावर खराब झालेले साडी काढून चांगली साडी नेसत आणि मुलींना शिकवत असत. हळूहळू इतरांपासून प्रेरित होऊन अनेक आई-वडील आपल्या मुलींना शिक्षणासाठी शाळेत पाठवू लागले. शाळेत मुलींची संख्या वाढू लागली परंतु काही जणांनी कर्मठ लोक शाळेत येत जाताना मुलींनाही रस्त्यावर त्रास देत त्यामुळे मुलींच्या आई वडील घाबरून आपल्या मुलींना शाळेत पाठवत नसत अशावेळी सावित्रीबाईंनी मुलींची आणि त्यांच्या पालकांची भेट घेऊन त्यांची समजत घालून त्यांना शाळेत आणण्याचे काम करत .सावित्रीबाई तन मनाने आपले कार्य करत होत्या . कितीही संकटे आले तरीही त्या डगमगल्या नाहीत. सावित्रीबाई या शाळेत येणाऱ्या मुलींच्या फक्त बाईच नव्हत्या तर त्या मुलींच्या आईही झाल्या प्रत्येक मुलीवर त्यांचे बारीक लक्ष असे मुलींच्या सर्व प्रकारच्या अडचणी त्या

[1] डॉ.अनिल कठारे,भारतीय स्त्री चळवळीचा इतिहास,एज्युकेशनल पब्लिशर्स संभाजीनगर,जून २०१३, पृ.क्र.१३९

समजून घेत आणि सोडवत.

**सावित्रीबाईंचे सामाजिक कार्य:-**

स्त्रियांची गुलामगिरीतून मुक्तता व्हावी यासाठी ज्योतिबा आणि सावित्रीबाई फुले अविरत झटत होते .त्या काळात समाजात कुळधर्म, व्रतवैकल्य, कुलाचार, केशवपन ,सतीची चाल, बालविवाहआणि जरठविवाह अशा अनेक प्रथा रूढ होत्या. परंतु त्यांचे हे हाल फुले पती-पत्नीला बघवत नव्हते स्त्रियांसाठी काहीतरी करावे असे सावित्रीबाईंना वाटू लागले. अशा रूढी परंपरांना तडा देण्यासाठी, स्त्रियांना एकत्र आणण्यासाठी आणि विचारांचे आदान प्रदान करण्यासाठी **महिला सेवा मंडळाची** १८५१-१८५२ मध्ये सावित्रीबाई फुले यांनी पुण्यात स्थापना केली. याचा मुख्य उद्देश महिलांच्या हक्कांसाठी जागरूकता निर्माण करणे, जातीय आणि लिंगभेद दूर करणे हा होता.

**महिला सेवा मंडळाचे कार्य:**

महिलांसाठी जातिभेदमुक्त सभा आयोजित करणे, जिथे सर्व जातीच्या महिलांना एकाच चटईवर बसवून समानतेचे प्रतीक दाखवले जायचे.बालविवाह, सतीप्रथा, विधवा विवाहाविरोधी मोहिमा चालवणे.विधवा आणि वंचित महिलांसाठी आश्रय देणे आणि शिक्षणाची संधी उपलब्ध करणे. या मंडळामुळे महिलांच्या सामाजिक स्थितीत सुधारणा झाली आणि स्त्री शिक्षणाच्या चळवळीला चालना मिळाली. सावित्रीबाईंनी यातून महिलांना सक्षम करण्यावर भर दिला.

**बालहत्या** प्रतिबंधक **गृह :-**

समाजातील बालविवाह आणि जरठ विवाह या प्रसांमुळे अनेकदा मुली लहान वयातच विधवा होत.पुढे त्यांचे पाऊल चुकले तर समाज त्यांना स्वीकारत नसे. अशाच वाट चुकलेल्या विधवा स्त्रियांसाठी सावित्रीबाईंनी बालहत्या प्रतिबंधक गृह १८५३ मध्ये स्थापन केले. हे विधवा महिलांसाठी आणि त्यांच्याच पोटी जन्माला आलेल्या मुलांच्या संरक्षणासाठीचे निवासस्थान होते. येथे गर्भवती विधवा सुरक्षित प्रसूती करू शकत आणि इच्छेनुसार मुलांना दत्तक देऊ शकत. सावित्रीबाई अशा मुलींची दयाळूपणे व प्रेमाने अहोरात्र काळजी करत.

**केशवपन प्रथेविरुद्ध संघर्ष:-**

महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या काळात विधवा स्त्री ने कुरूप दिसावे, तिच्याकडे कोणीही पाहू नये किंवा तिला कोणाच्या बद्दल आकर्षण निर्माण होऊ नये यासाठी जबरदस्ती त्यांचे केशवपन अर्थात टक्कल केले जात असे. हे काम न्हावी करत असत. अशावेळी गुलामगिरीत जगणाऱ्या विधवा स्त्रियांना सांगून काही फायदा होत नव्हता. धर्म मार्तंड लोक ऐकणारे नव्हते म्हणून ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई यांनी न्हाव्यांचे मत परिवर्तन करण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी १८५२ साली एक परिषद बोलावली. त्यात विधवा स्त्रियांची परिस्थिती व केशवपन प्रथा किती वाईट आहे यावर चर्चा झाली. नाभिकांनी विधवांचे टक्कल करू नये असे ठरवले. ही परिषद त्यांच्या 'महिला सेवा मंडळ'च्या (१८५२ मध्ये स्थापन) माध्यमातून झाली, ज्यामुळे न्हाव्यांनी विधवांचे केशवपन बंद करण्यासाठी संप केला. 'द पूना ऑब्झर्व्हर' (२९ मे १८५२) मध्ये आली आहे.[2]

**विधवा पुनर्विवाह:-**

२६ जुलै १८५६ रोजी ब्रिटिशांनी विधवा विवाह कायदा अमलात आणला त्यामुळे विधवांना पुनर्विवाह करण्याचा हक्क प्राप्त झाला परंतु समाजामध्ये विधवांना पुनर्विवाह करण्याचे अधिकार नव्हते महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई यांनी विधवा पुनर्विवाहासाठी समाजात जागृती केली आणि त्यांच्या प्रयत्नाने पुण्याच्या गोखले बागेत शेणवी जातीत पहिला विधवा पुनर्विवाह १८६४ मध्ये घडून आला.

**अस्पृश्यांसाठीचे कार्य:-**

समाजात स्त्रिया आणि अस्पृश्य हे तळागाळाला गेलेले घटक होते एकीकडे स्त्रियांसाठी फुले दांपत्याचा संघर्ष सुरूच होता परंतु दुसरीकडे दलित समाजासाठी त्यांचे मन तुटत असेल दलितांवर होणारे अत्याचार पाण्यासाठी होणारी वणवण त्यांना पहावत होती अस्पृश्यांची सावली कोणी अंगावर पडू तेच नव्हते आणि अजूनही जाचक अटी दलितांवर असत अशातच दलित

[2] https://www.forwardpress.in/2014/01/savitribai-harbinger-of-social-revolution/

समाजासाठी ही कार्य करावे हे उद्देश ठेवून फुले दाम्पत्य कामाला लागले. मुलींसाठी शाळा उघडल्यानंतर महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी १८५१ मध्ये महार वाड्यात अस्पृश्यांसाठी शाळा उघडली. सावलीचाही विटाळ मांडला जाणाऱ्या काळात त्यांनी स्वतःला स्त्री सुद्रांच्या उद्धारासाठी वाहून घेतले घोटभर पाण्यासाठी वनवान फिरणाऱ्या अस्पृश्यांना स्वतःच्या घरातील पाण्याचा हौल मोकळा करून दिला केवढे हे क्रांतिकार्य पुन्हा स्थापलेल्या महिला सेवा मंडळामार्फत १८५२ मध्ये कोणाच्या कलेक्टरच्या पत्नी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केलेल्या तिळगुळाचे कार्यक्रमाची छापील पत्रिका त्यांच्या अस्पृश्य देऊन कार्याची माहिती सांगण्यास पुरेशी आहे ती पत्रिका अशी होती १३-१-१८५२ रोजी पुणे कलेक्टर साहेबांच्या पत्नी मिसेस जोन्स यांचे अध्यक्षतेखाली सार्वजनिक तिळगुळ समारंभ होणार आहे. तरी सर्व स्त्रियांनी आपल्या लेकीसुना घेऊन यावे. समारंभ सायंकाळी ५ वाजता आहे. कोणत्याही जातीच्या अथवा धर्माच्या बायका आल्या तरी त्या एकाच जाजमावर बसतील. जातीभेद व पक्षपात न करता सर्वांना सारखेच धरून हळदीकुंकू लावण्यात आणि तिळगुळ वाटण्यात येईल." जातीधिष्ठीत समाजात स्त्रीची विभागणी न होता सर्व स्त्रिया स्त्री म्हणून एक आहेत हा विचार त्यांनी आपल्या कृतीतून दाखवून दिला.[3]

**सत्यशोधक समाजाचे नेतृत्व:-**

महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या समाजक्रांतीतील एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे सत्यशोधक समाज होय सत्यशोधक समाजाची स्थापना २४ सप्टेंबर १८७३ रोजी झाली. आपल्या संपूर्ण आयुष्यभर सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून फुले दांपत्याने अनेक समाजसुधारणांचे कार्यक्रम राबवले महात्मा ज्योतिबा फुले त्यानंतर सावित्रीबाईंनी न डगमगता त्यांचे हे कार्य अविरतपणे पुढे चालू ठेवले. १८९३ रोजी सासवड येथे सत्यशोधक समाजाची विसावी परिषद भरवली तिचे अध्यक्ष पद सावित्रीबाईंनी समर्थपणे भुषविले. १८९६ च्या दुष्काळात सावित्रीबाईंनी फार मोलाचे कार्य केले.बऱ्याच लोकांना खायला अन्न मिळत नव्हते. त्यावेळी सत्यशोधक समाजाची बैठक घेतली सावित्रीबाईंच्या नेतृत्वाखाली एक शिष्टमंडळ ब्रिटिश गव्हर्नरला भेटायला गेले. गावोगावी दुष्काळी कामे सुरु करण्याची मागणी या शिष्टमंडळाने ब्रिटिश गव्हर्नरकडे केली. ब्रिटिश सरकारने गावागावांत दुष्काळी कामे सुरु केला. अशाप्रकारे सावित्रीबाई फुले यांच्या प्रयत्नांमुळे दुष्काळ ग्रस्तांसाठी रोजगार हमी योजना सुरु झाली होती. त्यावेळी दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना शेतीवरील करात सूट मिळावी. मोफत बी-बियाणे मिळावेत यासाठी सावित्रीबाईंनी प्रयत्न केले. या दुष्काळात सावित्रीबाईंनी मुलांसाठी अन्नछत्रे उघडली होती.[4]

**निष्कर्ष:-**

सावित्रीबाई फुले यांचे जीवन हे केवळ एका व्यक्तीची कथा नसून, संपूर्ण समाजाच्या उत्थानाची प्रेरणादायी गाथा आहे. या शोधनिबंधातून त्यांच्या वैयक्तिक आयुष्यावर प्रकाश टाकताना, ग्रामीण बालपणापासून ज्योतिबा फुले यांच्या साथीने सामाजिक क्रांतीचा प्रवास कसा उमगला, हे स्पष्ट झाले. शिक्षणविषयक कार्यात त्यांनी भारतातील पहिली महिला शिक्षिका म्हणून भिडे वाड्यातील शाळा सुरू करून लिंगभेदाच्या भिंती भेदल्या, ज्यात दगडफेक आणि बहिष्काराची कठोर परीक्षा देऊनही त्या डगमगल्या नाहीत. सत्यशोधक समाजाच्या नेतृत्वात त्यांनी १८९३ च्या सासवड परिषदेपासून १८९६ च्या दुष्काळात रोजगार हमी आणि अन्नछत्रे उघडण्यापर्यंतच्या प्रयत्नांतून समानतेचा ध्वज फडकावला. स्त्री आणि वंचितांसाठी केलेले कार्य – महिला सेवा मंडळ, बालहत्या प्रतिबंधक गृह, केशवपन प्रथेविरोधी संघर्ष, विधवा पुनर्विवाह आणि अस्पृश्यांसाठी पाण्याचा हौल उघडणे – हे सर्व केवळ कृती नव्हते, तर एका नव्या समाजाची रचना करण्याचे बीज होते.

सावित्रीबाई फुले या १९व्या शतकातील क्रांतिकारिणी होत्या, ज्यांनी शिक्षणाला शस्त्र म्हणून उपभूत करून स्त्रियांच्या गुलामगिरीला तडा दिला. आजच्या काळात, जेव्हा लिंगभेद आणि जातीभेद अद्यापही अस्तित्वात आहेत, त्यांच्या कार्याचा वारसा अधिक प्रासंगिक ठरतो. त्यांच्या शब्दांतच, "शिक्षण हे स्त्रियांचे अस्त्र आहे, ज्याने समाजाच्या अंधारावर विजय मिळवता येईल." हा निबंध त्यांच्या या विजयाची जाणीव करून देणारा असला तरी, खरा परिवर्तन सतत चालू असलेल्या संघर्षात आहे. सावित्रीबाईंच्या

[3] प्रा.लेफ्टनंट सुनिता बोर्डे खडसे ,प्रा.संतोष केशव खडसे, ऐतिहासिक परिप्रेक्ष्यातील स्त्रिया इ.स.१८००-१९८४, शुभम पब्लिकेशन्स पुणे २०१०, पृ.क्र.५२
[4] प्रा. डॉ. नंदा पंढरीनाथ कंधारे, सावित्रीबाई फुले यांचे कार्य, जर्नल ऑफ ईस्ट वेस्ट थॉट, जानेवारी- मार्च २०२५ विशेषांक पृ. क्र. ४५४

आदर्शाने प्रेरित होऊन प्रत्येक व्यक्तीने समानतेच्या दिशेने पावले टाकावीत, हीच खरी श्रद्धांजली. त्यांच्या स्मृतींना वंदन!

**संदर्भ :-**

१. डॉ.अनिल कठारे,भारतीय स्त्री चळवळीचा इतिहास,एज्युकेशनल पब्लिशर्स संभाजीनगर,जून २०१३
२. प्रा.लेफ्टनंट सुनिता बोर्डे खडसे ,प्रा.संतोष केशव खडसे, ऐतिहासिक परिप्रेक्ष्यातील स्त्रिया इ.स.१८००-१९८४, शुभम पब्लिकेशन्स पुणे २०१०
३. प्रा. डॉ. नंदा पंढरीनाथ कंधारे, सावित्रीबाई फुले यांचे कार्य, जर्नल ऑफ ईस्ट वेस्ट थॉट, जानेवारी- मार्च २०२५ विशेषांक
४. नम्रता ढाळे, सावित्रीबाई फुले यांचे जीवन आणि कार्य ,रिव्ह्यू ऑफ रिसर्च ,जुलै २०२१
५. रेश्मा भगत सावित्रीबाई फुले यांचे स्त्री शिक्षणाचे विचार आणि कार्य हिस्टॉरिकल रिसर्च जर्नल जानेवारी,२०२१
६. सावित्रीबाई फुले संग्रह , महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ , महाराष्ट्र सरकार
७. https://www.forwardpress.in/2014/01/savitribai-harbinger-of-social-revolution/